# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबतच्या निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे वऱ्हाळा तलाव येथून ५.० द.ल.लि. क्षमतेचे वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्र येथे कच्च्या पिण्याच्या पाण्यावर शुद्धीकरणाच्या प्रक्रियेसाठी ॲलम व ब्लिचिंग पावडरद्वारे जलशुद्धीकरण प्रक्रिया करुन भिवंडी शहराला शुद्ध पाणी पुरवठा केला जातो.

भिवंडी शहरातील नागरीकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. भिवंडी शहरातील नागरीकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे करीता वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर खरेदी करावी लागणार आहे. सन २०२३-२४ या वर्षाकरीता एका दिवसाला ४५० किलो ॲलम X ३६५ दिवस = १६४२५० किलो इतका ॲलम लागणार आहे व ब्लिचिंग पावडर एका दिवसाला ४५ किलो X ३६५ दिवस = १६४२५ किलो इतकी ब्लिचिंग पावडर लागणार आहे. तसेच काटई येथील मल:शुद्धीकरण केंद्राकरीता ब्लिचिंग पावडर एका दिवसाला ५० किलो X ३६५ दिवस = १८२५० किलो तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल मध्ये द्रावण करुन टाकणे करीता प्रत्येक प्रभागाकरीता अंदाजे २०० किलो वार्षिक या प्रमाणे १००० किलो ब्लिचिंग पावडर अशी एकुण ३५६७५ किलो ब्लिचिंग पावडर लागणार आहे.

त्याकरीता खुल्याबाजारातुन दर प्राप्त करुन प्राप्त किमान दरांपैकी ब्लिचींग पावडर प्रति किलो ₹६४/- व फस्ट ग्रेड ॲलम प्रति किलो ₹१९/- याप्रमाणे सर्वांत कमी दराचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹५३,३९,९५०/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

उपरोक्त कामाकरीता दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन (१ वर्षाकरीता) ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या असुन त्याचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. मे. डॅपमन्स पेस्ट कंट्रोल ॲण्ड अलाईड सर्व्ही. - अंदाजपत्रकीय दराने
२. मे. आयडीयल केमीकल्स इ. प्रा. लि. - अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ४.३७% जास्त दराने
**३. मे. बुबेरे ॲण्ड असोसिएटस् - अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२% कमी दराने**

वरील प्राप्त दरांपैकी मे. बुबेरे ॲण्ड असोसिएटस् यांची निविदा अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२% कमी दरांची म्हणजेच रु.४६,९९,१५६/- मात्र सर्वांत कमी दरांची प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबतच्या निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.४६,९९,१५६/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबतच्या (बारा महिन्यांकरीता) निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे कामी व पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक : २८४** **दिनांक : १६/०८/२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबतच्या (बारा महिन्यांकरीता) निविदेतील प्राप्त दरांच्या रु.४६,९९,१५६/- मात्रच्या प्रशासकिय ठरावास मान्यता बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत (बारा महिन्यांकरीता) निविदेतील प्राप्त दरांच्या रु.४६,९९,१५६/- मात्रच्या प्रशासकिय ठरावास मान्यता देऊन पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**